# 7.1.1: Reports on Gender Equity Promotion Programs

## 1) Health and Nutrition Workshop

## M.S.P Arts And L.P.T Commerce College Manora, Dist. Washim

## Department of Home-Economics

## अहवाल

## एकदिवसीय कार्यशाळा

## आहार व आरोग्य

**दि.१८/०२/२०१९**

आपल्या महाविद्यालयातील गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने आहार, आरोग्य व त्वचा या विषयावर दि.१८/०२/२०१९ रोजी ११:३० ला महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या प्रथम सत्राला मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. निकिता चव्हाण MBBS यवतमाळ यांना आमंत्रित करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एस. ठाकरे यांच्या हस्ते झाल्यानंतर प्राचार्य साहेबांनी उद्घाटन वर भाषण करतांना विद्यार्थीनी समोर गृहअर्थशास्त्र विषयाचे महत्व स्पष्ट करून सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थिनीनसाठी गृहअर्थशास्त्र हा विषय आपल्याला स्वयंरोजगारासाठी कसा उपयुक्त आहे. आणि आपले आरोग्य व त्वचा निरोगी राहण्यासाठी या विषयाचा सर्वांनी लाभ घ्यावा दैनंदिन जीवनात विद्यार्थिनीनि उपयोग करून सामाजिक आरोग्य सृढ ठेवण्यासाठी समाजाला मार्गदर्शन करावे.

त्यानंतर डॉ. निकिता चव्हाण यांनी आपल्या भाषणात विद्यार्थी जीवनातील या महत्वाच्या टप्प्या मध्ये कसे वर्तन असावे आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी आपल्या आहारात कोणकोणते घटक असावेत या विषयाचे मार्गदर्शन केले. लहान मोठ्या आजाराची लक्षने आढळून आल्यास आपल्या नजीकच्या आरोग्य केंद्राचा सल्ला घेतला पाहिजे त्याच प्रमाणे महिलांनी आपले आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमित

वायाम व योगासने करण्याचा सल्ला डॉ. चव्हाण मॅडम यांनी दिला कार्यशाळेच्या आयोजिका आर. ए. नक्षिने यांनी समतोल आहार कसा असावा आणि कार्यशाळेच्या आयोजना मागचा उद्देश स्पष्ट करून सांगितला या कार्यशाळेत महाविद्यालयातील गृहअर्थशास्त्र विभाग आणि इतर विद्याशाखेच्या एकूण २०० विद्यार्थिनी उपस्थित होत्या.









Principal
M. S. P. Arts, Sci. & K. P. T. Comm.
College, Monora Dist. Washim

2) <u>Blood Checking Camp</u>

M.S.P. Arts and L.P.T Commerce College Manora, Dist. Wahim

## Department of Zoology

**5/2/2018**

# Report

On

# **H**ealth **C**heck up **C**amp

Department of Zoology with the collaboration of Government Hospital Manora organized a health check up camp on 5th Feb. 2018 at college in Laboratory of Zoology. The camp was started in the gracious presence of **Dr. N.S. Thakre**, principal of the institution under the overall supervision of **Dr. Seema Keswani**, Assistant Prof. & Head Department of Zoology. The camp was facilitated for all the students (B.Sc. B.A, B.Com.) along with faculty members.




Dr. N.S. Thakre, Dr. Seema Keswani along with members of Govt. hospital Manora

**AIMS AND OBJECTIVES:** The aim of health check up is to help, find, prevent or lessen the effect of disease. Health Checkups can help a person understand their health's need, values and concerns, and help identify some potential health risk factors where they can make healthy improvement. The main aim and objectives of this program was to bring awareness of health consciousness among the students and communities.

At local levels the department took an initiative to bring the health awareness in students. Through this program a very positive message gone to society. Students were acquired the practical knowledge of the pathological skills etc.








Blood Checkup of students and faculty members in zoology laboratory

**OUTCOMES:** The students were acquired the knowledge pathological skills to detects the various diseases related to blood like Anemia (scarcity of haemoglobin) , Thalassaemia, and Sickle cell anemia etc. Reports indicated that the levels of haemoglobins are very low in students especially in the female students. Through these students the department of zoology enabled to aware the communities regarding the health and their nutritional requirements in daily diet profile etc.




H. O. D.
Dept. of Zoology
M.S.P. Arts, Sci. & K.P.T. Comm. College
MANORA Dist. Washim

**Dr. Seema Keswani**
(HOD, Zoology)

Principal
M.S.P Arts, Sci. & K. P. T. Comm.
College, Manora Dist. Washim

**Dr. N.S. Thakre**
(Principal)

## 3) Health Awareness Workshop for Girls

# मातोश्री सुभद्राबाई पाटील कला,विज्ञान व कै.पांडूरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय,मानोरा जि.वाशिम

**Girls Guidience Committee**

प्रा.आर.व्ही.इंगोले

अहवाल

विषय :- विद्यार्थीनींना आरोग्य विषयक मार्गदर्शन

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने एम.एस.पी.महाविद्यालय मानोरा येथे विद्यार्थीनी मार्गदर्शन समितीच्या वतीने दि. 10.08.2017 ला आरोग्य विषयक मार्गदर्शन कार्यशाळा विद्यार्थीनीकरीता आयोजीत केली होती. या कार्यशाळेकरीता प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.अर्पना बन्नोरे दिग्रस ह्या होत्या. या कार्यशाळेला त्यांनी आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. विद्यार्थीनींच्या अनेक आरोग्य विषयक समस्य जाणून घेवून त्या समस्यांचे निराकरण केले. विद्यार्थीनींनी सुदृढ आरोग्याकरीता कोणता आहार घ्यावा आरोग्य विषयक काय काळजी घ्यावी तसेच आरोग्य विषयक विविध समस्या जर निर्माण झाल्या तर त्याचे निराकरण तज्ञांच्या मार्गदर्शनाने कसे करावे या विषयी माहिती दिली. Para या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एस.ठाकरे सर होते. त्यांनी सुध्दा विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. प्रमुख उपस्थिती प्रा.आर.ए.नक्षिणे, प्रा.एस.पी.भलावी यांची लाभली. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा.आर.व्ही.इंगोले यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.एस.पी.भलावी यांनी केले. या कार्यक्रमामध्ये एकूण 170 विद्यार्थीनी उपस्थित होत्या. ह्या सर्व विद्यार्थीनींनी या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

करीता अहवाल माहितीस्तव सविनय सादर.

दिनांक :

आपला विश्वासू

प्रा.आर.व्ही.इंगोले

Principal
M.S.P. Arts Sci. & K.P.T. Comm. College, Manora Dist. Washim

## 4) <u>Beti Bachao-Beti Padaao Essay Competition at Taluka Level</u>

# M.S.P Arts And L.P.T Commerce College Manora, Dist. Washim

## Department of Home-Economics

## अहवाल

प्रती ,

मा. प्राचार्य साहेब ,

मा.सु.पा. महाविद्यालय, मानोरा.

विषय :- निबंध स्पर्धेचा अहवाल सदर करणे बाबत.

महोदय ,

वरील विषयास अनुसरून आपणास सविनय विनंती कि, आपल्या महाविद्यालया द्वारे मानोरा तालुका स्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निबंध स्पर्धेचा विषय " बेटी बचाव बेटी पढाव " होता या स्पर्धेमध्ये एकूण १० विद्यार्थींनी सहभागी झाल्या. त्यात राष्ट्रमाता इंदिरा गांधी कन्या विद्यालय व महिला कनिष्ठ महाविद्यालयातील ०५ , एल.एस.पी.एम. ०२, व मा.सु.पा. महाविद्यालय मानोरा ०३ निबंध प्राप्त झाले.

त्यात खालीलप्रमाणे क्रमांक देण्यात आले.

1) प्रथम क्रमांक – कु. सोनु मधुकर चव्हाण.
2) द्वितीय क्रमांक - कु. ऋतिका कातीनाथ संवहळे.
3) तृतीय क्रमांक - कु. अंकिता राजेश इहरे.

Principal
M. S. P. Arts, Sci. & L. P. T. Comm.
College, Manora Dist. Washim

## 5) Malnutrition Awareness Workshop

ज्ञानोपासक शिक्षण प्रसारक संस्था मानोरा र.नं.एफ १३१३ द्वारा संचालीत

**मातोश्री सुभद्राबाई पाटील कला,विज्ञान व कै.पांडूरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय,मानोरा.जि.वाशिम.**

दूरध्वनी क्रमांक:- ०७२५३-२६३२२७ | email id.mspkpt@reddifmail.com | इन्डेक्स नंबर २००६००३.

श्री.अरविंद देवमनजी इंगोले, अध्यक्ष | डॉ.एन.एस.ठाकरे., प्राचार्य | श्री.महादेवराव ज. ठाकरे., सचिव

जा.क्र. ६ - 7057/2017
दि. 31/3/2017

प्रति,
मा.संचालक
प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती.

विषय :- कुपोषण,सर्वेक्षण जागृती व उपाय यावर घेतलेल्या कार्यशाळेचा अहवाल व हिशेब सादर करणे बाबत.

मा.महोदय,

वरिल विषयास अनुसरून विनंती की,आमचे मा.सु.पा.कला,विज्ञान व कै.पां.ठा.वाणिज्य महाविद्यालय,मानोरा येथे दिनांक ०३ मार्च २०१७ ला कुपोषण,सर्वेक्षण जागृती व उपाय या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सादर कार्यशाळेचा सविस्तर अहवाल व कार्यशाळेवर झालेल्या खर्चाचा हिशेब आपणाकडे सादर करीत आहो.कृपया सदर अहवाल व हिशेब स्विकारवा हिच विनंती.

सोबत.

१) अहवाल
२) निमंत्रण पत्रीका
३) प्रमाणपत्र
४) छायाचित्र
५) वृत्तपत्र कात्रण
६) हिशेब (माणकासह)
७) उपस्थित यादी

Principal
M.S.P. Arts, ... P.T. Comm College, Manora Dist. Washim

O/C
Received
31.3.17

# अहवाल

प्रती,
मा. संयोजक
प्रौढ निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग
संत गाडगे बाबा अमारावती विद्यापीठ अमरावती.

विषय :- कुपोषण सर्वेक्षण जागृती व उपाय एक दिवसीय कार्यशाळेचा अहवाल स्वीकारणे बाबत.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणास सविनय विनंती की, आमच्या महाविद्यालयामध्ये प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग व मा.सु.पा. कला, विज्ञान व कै. पा. ठाकरे वाणिज्य महाविद्यालय मानोरा जि. वाशिम. यांच्या संयुक्त विधमाने कुपोषण सर्वेक्षन जागृती व उपाय एक दिवसीय कार्यशाळा दि. ३ मार्च २०१७ ला आयोजीत करण्यात आली होती. त्याचा अहवाल खालील प्रमाणे देण्यात येत आहोत.

१ दि. ३ मार्च २०१७ ला सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये उद्घाटन सोहळा पार पडला या कार्यशाळेचे उद्घाटनाचे अध्यक्ष म्हणुन श्री. अरविंद भाउ इंगोले. (अध्यक्ष ज्ञानोपासक शिक्षण प्रसारक संस्था मानोरा) हे होते. तर उद्घाटक डॉ. श्रीकांत पाटील , संचालक प्रौढ निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती हे होते. तर प्रमुख उपस्थीती मध्ये प्राचार्य डॉ. एन एस. ठाकरे मा. सु. पा. कला ,विज्ञान व कै. पा. ठाकरे वाणिज्य महाविद्यालय मानोरा व श्री. इंगोले साहेब, बाल विकास प्रकल्प अधिकारी , मानोरा हे होते.

२ आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री अरविंदभाउ इंगोले यांनी अंगनवाडी सेवीका कमी मानधनात चांगले काम करीत असतात. प्रत्येक गावातील कुपोषन कमी करण्यासाठी व कुपोषीत बालक निर्माण होउ नये म्हणुन स्तनदा माता यांनी पौष्टीक व चांगला आहार घ्यावा त्यांच्या आहारासाठी काही मदत देण्यास तयार आहोत. अशी घोषणा संस्थेच्या अध्यक्षांनी केले.

त्याच बरोबर डॉ. श्रीकांत पाटील संचालक प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी आपल्या उद्घाटन पर भाषनात अंगनवाडी सेवीकांसाठी व महाविद्यालयीन विद्यार्थानसाठी अमरावती विद्यापीठात वेगवेगळ्या विषयावर कोर्सेस पुर्ण सुरु असल्याची माहीती उपस्थीतांना दिली. ज्या मुळे आपल्या कुटुंबांना आर्थीक साहय मिळेल. व कुटुंबाचा आर्थीक दर्जा सुधारेल. त्याच प्रमाणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. ठाकरे यांनी प्रमुख पाहुने म्हणुन आपले मनोगत व्यक्त केले मानोरा तालुक्यातील कुपोषन कमी करण्यासाठी कमित कमी पैशात जास्तीत जास्त पौष्टीक पदार्थ कसे मिळेल ( Low Cost & High Nutritive ) याकडे मातांनी लक्ष दयावे जनेकरुन कुपोषीत बालक निर्मान होनार नाही. व सुदृढ बालकाचा जन्म होईल त्याच प्रमाणे बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी सुध्दा आपले मनोगत व्याक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. आर. ए. नक्षिने यांनी केले. प्रास्ताविकात गृहअर्थशासत्र विभाग नेहमी अंगनवाडीमध्ये पोषन आहार सप्ताह साजरा करीत असते. पोषन आहार जागृती व्दारे गर्भवती स्त्रीया, स्तनदा माता यांनी पोष्टीक आहाराची माहीती देत असुन घरगुती पदार्थातुन पौष्टीक आहार कसा मिळेल याची माहीती देत असुन. जनेकरुन कुपोषीत माता व मुल निर्माण होवु शकणार नाही.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. जे.एन. कांबळे यांनी केले या कार्यक्रमासाठी अंगनवाडी सेवीका महाविद्यालयातील विद्यार्थीनी २०५ उपस्थीत होत्या व आभार प्रा. एम. पी. ठाकरे यांनी मानले.

**प्रथम सत्र :-** प्रथम सत्राला ठीक १२.०० वाजता सुरवात झाली. प्रथम सत्रामध्ये सौ. कांबळे मॅडम मुख्य सेविका , मानोरा यांनी कुपोषन एक सामाजीक समस्या या विषयावर व्याख्यान दिले. कुपोषनामुळे सामाजीक स्वास्थावर परीणाम होतो. माता जर कुपोषित असेल तर होनारे बालक सुध्दा कुपोषित होईल – व त्याचा शारीरीक विकास होनार नाही व त्याचे स्वास्थ ही चांगले राहनार नाही. व सदृढ बालक निर्माण होण्यास कुपोषन कमी करावे लागेल असे त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगीतले. प्रथम सत्राचे अध्यक्ष सौ. काळे मॅडम यांनी सुध्दा अध्यक्षीय भाषनात कुपोषनावर आपले मत व्यक्त केले.

त्या नंतर दुपारी १.३० ते २.०० नाश्ता व चहा उपस्थीतांना देण्यात आला.

**व्दितीय सत्र:-** व्दितीय सत्र दुपारी २.०० वाजता सुरु झाले. व्दितीय सत्राच्या व्याख्यात्या डॉ. लीना चितलांगे प्राचार्य, सावित्रीबाई फुले महीला महाविद्यालय वाशिम हया होत्या. त्यांनी कुपोषण व आहार उपचार यावर मार्गदर्शन केले कुपोषन झाल्यावर कशाप्रकारचा आहार घ्यावा व त्यावर उपचार कशाप्रकारे करावयवा याचे विस्तृत मार्गदर्शन Power Point व्दारे उपस्थीतांना दिले. उपचाराबाबत प्रश्नोत्तरा व्दारे माहीती दीली

दुस-या सत्राच्या अध्यक्ष ठाकरे मॅडम हया होत्या. त्यांनी सुध्दा आहार उपचार यावर विस्तृत मार्गदर्शन केले.

त्या नंतर ३.३० ते ४ या वेळेत चहा देण्यात आला.

समारोप :- समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एन. एस. ठाकरे होते. तर प्रमुख उपस्थिती मध्ये श्री महादेवराव ठाकरे (सचिव ज्ञानोपासक शिक्षण प्रसारक संस्था मानोरा) व लीना चितलांगे हया होत्या त्या नंतर प्रमाण पत्राचे वाटप करण्यात आले. शेवटी राष्ट्रगिताने कार्यक्रमाची सांगता झाली.

Principal
M.[illegible] & K.P.T. Comm,
[illegible] Manora Dist. Washim

# 6) Workshop on sexual Harassment of woman at workplace

M.S.P Arts, Science and K.P.T Commerce College, Manora Dist. Washim

Department of Home-Economics

## Workshop on sexual Harassment of woman at workplace

### 27 - Feb – 2017

प्रती,

प्राचार्य साहेब,

मा.सु.पा. महाविद्यालय, मानोरा.

विषय :- कार्यशाळेचा अहवाल सादर करणे बाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणास सविनय विनंती कि, आपल्या महाविद्यालयामध्ये संपन्न झालेल्या या कार्यशाळेच्या ( Workshop on sexual Harassment of woman at workplace ) अहवाल पुढील प्रमाणे सदर करण्यात येत आहे.

1) प्रथम सत्र – कार्यशाळेच्या प्रथम सत्रामध्ये आमंत्रित ॲड. पवन राठोड यांनी sexual Harassment आणि भारतीय कायदे या विषयावर उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करतांना कामच्या ठिकाणी व महाविद्यालयात वावरतांना आपल्यात काही मानसिक व शारीरिक त्रास होत असेल तर अश्या केस मध्ये कोणकोणत्या कायद्याने मुलींचे संरक्षण होते अश्या कायद्याची सविस्तर माहिती उपस्थित विद्यार्थिनींना दिली. सत्राच्या शेवटी विद्यार्थिनींनी विचारलेल्या प्रश्नांवर ॲड. पवन राठोड यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

2) दुसरे सत्र – दुपारच्या दुसर्या सत्रात ॲड. स्नेहा जोशी यांनी स्त्रीविषयक कायदे या विषयावर उपस्थित विद्यार्थीनी समोर व्याख्यान दिले. व्याख्यानं दरम्यान यांनी १९५२ पासून आजपर्यंत भारतीय स्त्रियांच्या संदर्भात त्यांच्या हिताचे व संरक्षणाचे जे कायदे झालेले आहेत त्याची माहिती विद्यार्थिनींना दिली.

या कार्यशाळेच्या शेवटी सामारोपामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एस. ठाकरे यांनी कार्यशाळेविषयी आपले मत व्यक्त करतांना

महाविद्यालयातील विद्यार्थिनी भयमुक्त वातावरणात कसे राहता येईल. त्याच्या सर्व उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.अश्याप्रकारे हि कार्यशाळा संपन्न झाली या कार्य्शालेला या कार्यशाळेला महाविद्यालयाच्या 52 विद्यार्थिनी उपस्थित होत्या कार्यशाळेमध्ये महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रा. जे.एन. कांबळे व प्रा.ए.वाय.अली यांनी सुद्धा समायोजित भाषण दिले.






Principal
M.S.P. Arts Sci. & K.P.T. Comm.
College, Manora Dist. Wastim

## **7)** Competitive Exam Guidance Workshop

### मातोश्री सुभद्राबाई पाटील कला,विज्ञान व कै.पांडूरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय,मानोरा जि.वाशिम

**Girls Guidience Committee**

प्रा.आर.व्ही.इंगोले

अहवाल

विषय :- स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन.

महोदय,

वरील विषयास अनुसरून विनंती की, शै.स.2016-17 मध्ये मा.सु.पा.महाविद्यालय मानोरा येथे विद्यार्थीनी मार्गदर्शन समितीच्या वतीने एक दिवशीय स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन दि. 28.01.2017 ला सकाळी 10.30 वाजता महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक हे प्रा.सागर घारट, मुक्त विद्यापीठ अमरावती यांना आमंत्रीत करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थीनींना स्पर्धा परिक्षेची तयारी करतांना काय करायला पाहीजे या विषयी मार्गदर्शन केले. स्पर्धा परिक्षेच्या यशस्वीते करीता ज्ञानाचा साठा वाढविणे गरजेचे आहे. व परिक्षेच्या पूर्व तयारी करीता प्रचंड वाचनाची आवश्यकता आहे. तसेच जिद्द, चिकाटी, अव्याहत परिश्रम हे किती महत्वाचे आहेत या विषयी माहिती दिली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.एस.ठाकरे सर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थीनींना स्पर्धा परिक्षा विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.आर.व्ही.इंगोले यांनी केले. कार्यक्रमाकरीता प्रा.आर.ए.नक्षीणे, प्रा.गजानन इंगोले, प्रा.आर.टी.ब्राम्हण हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन कु.मोहिनी मुंडवाईक बी.ए.1 हीने केले तर आभार प्रदर्शन कु.सोनू चव्हाण बी.ए.1 हिने केले. या कार्यक्रमाचा एकूण 160 विद्यार्थ्यांना लाभ मिळाला.

करीता कार्यक्रमाचा अहवाल सविनय सादर.

दिनांक : 28.01.2017

आपला विश्वासू

प्रा.आर.व्ही.इंगोले

Principal
M.S.P. Arts Sci. & K.P.T. Comm. College, Manora Dist. Washim

વિદ્યાર્થીઓ ને સ્પર્ધા પરિક્ષા વિષયક માર્ગદર્શન કરતાં ના
પ્રા. સાગર ઠાકર વ ઉપસ્થિત વિદ્યાર્થીઓ



કોલેજ વિભાગાન્તર્ગત સ્પર્ધા પરિક્ષા માર્ગદર્શનના
લાભ લેતાં ના વિદ્યાર્થીઓ ઈ.સ. 2016-17

